**रयत शिक्षण संस्थेचे,**

**राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.**

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अहवाल – २०२०**

दि.१६ जानेवारी २०२०

दि.०१ ते १५ जानेवारी दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा सर्वत्र साजरा केला जातो. राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये ही मराठी भाषा संवर्धन पंधरवडा विविध उपक्रम घेऊन साजरा करण्यात आला. या वेळी मा.शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार महाविद्यालयामध्ये 'मराठी स्नेही मंडळ' तयार करण्यात आले. या स्नेही मंडळाच्या माध्यमातूनच विविध उपक्रम घेण्यात आले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात निबंध व शुद्धलेखन स्पर्धा घेण्यात आली. दि.०४ जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयात निबंध स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये एकूण २२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या निबंधाचे परीक्षण प्रा.अंकुश घुले यांनी केले. या स्पर्धेत कु.योगिता नामदेव पाटील व कु.सविता विठ्ठल हुंबे यांनी प्रथम क्रमांक पटकवला. तर श्री.शिवम धोंडीराम पुजारी व श्री.संतोष विठू कस्तुरे यांनी व्दितीय क्रमांक पटकवला. कु.सरिता विठ्ठल शेळके हिने अनुक्रमे तृतीय क्रमांक मिळविला. या निबंध स्पर्धेत कु.प्रतीक्षा नारायण रेळेकर व कु.राजनंदिनी एकनाथ कांबळे यांची उत्तेजनार्थ परितोषिकासाठी निवड करण्यात आली.

दि.०८ जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयामध्ये 'नटसम्राट' हे वि.वा.शिरवाडकर यांचे नाटक दाखविण्यात आले. हे नाटक पाहण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.०९ जानेवारी २०२० मराठी भाषा संवर्धन पंधरवडातील तिसरा आणि महत्त्वाचा उपक्रम म्हणजे मराठीतील नामवंत साहित्यिकांच्या फोटोचे भव्य प्रदर्शन ठेवण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालायचे उपप्राचार्य डॉ.व्ही.व्ही.किल्लेदार यांनी केले. यावेळी ज्युनिअर विभागाच्या उपप्राचार्या सौ.एन.एस.साळुंखे, कला शाखेचे प्रमुख डॉ.संजय साठे, मराठी विभाग प्रमुख डॉ.एस.जे.आवळे व इतर मान्यवर उपस्थित होते. हे प्रदर्शन दिवसभर सर्वांसाठी खुले होते. या प्रदर्शनाला अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. या प्रदर्शनाचा लाभ शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर सेवक यांनी घेतला.

दि.१० जानेवारी २०२० रोजी मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त शुद्धलेखन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण ११ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे परीक्षण प्रा.अंकुश घुले यांनी केले. या स्पर्धेत कु.सविता विठ्ठल हुंबे हिने प्रथम क्रमांक पटकावला तर कु.मंगल विठ्ठल हुंबे हिने व्दितीय क्रमांक पटकावला. कु.राजनंदिनी एकनाथ कांबळे हिने तृतीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेत श्री.अक्षय एकनाथ कांबळे व कु.स्नेहा दत्तात्रय शिंदे यांनी उत्तेजनार्थ पारितोषक पटकावले. मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त

दि. १३ जानेवारी २०२० रोजी दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा व महाविद्यालयाचा मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा.अमर सकटे आणि फिनिक्स क्रिएशन या संस्थेचे कलाकार यांचे 'एकांकिका सादरीकरण' घेण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा.प्राचार्य डॉ.एस.टी.साळुंखे यांनी केले. यावेळी कला शाखेचे प्रमुख डॉ.संजय साठे व मराठी विभाग प्रमुख एस.जे.आवळे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अशा प्रकारे महाविद्यालयामध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा विविध उपक्रम घेऊन साजरा करण्यात आला. हा भाषा संवर्धन पंधरवडा विविध उपक्रम घेऊन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.एस.टी.साळुंखे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले.

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE ★ KOLHAPUR

प्रा.डॉ.सिंधू जे. आवळे

मराठी विभागप्रमुख